# मराठवाडा कृषि विद्यापीठाचा बिजोशितल सोबत सामंजस्य करार

दि. ६ जुलै २०१२ रोजी मराठवाडा कृषि विद्यापीठ आणि जालना येथील बिजोशितल सीड कंपनी यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. मराठवाडा कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु, डॉ.के.पी.गोरे यांनी तर बिजोशितल सीड कंपनी तर्फे डॉ.सुरेश अग्रवाल यांनी स्वाक्ष-या करुन अहवालाचे एकमेकांना हस्तांतरण करण्यात आले.

करारांतर्गत विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनां पदव्योत्तर शिक्षणाची (M.Sc. व Ph.D.) संधी मिळणार आहे. भाजीपाला पिकांमध्ये बिजोशितल सीड कंपनीचे संशोधन कार्य चांगले आहे. तसेच मकृवित कडधान्य पिके, तृणधान्ये, सोयाबीन, कापूस, भाजीपाला, फळपिके यावर उत्तम असे संशोधन कार्य झालेले आहे.

याकरारामुळे भाजीपाला पिकावरील संशोधनाला बळकटी मिळणार आहे. जैव तंत्रज्ञानाव्दारे विशेषत: तूर व भाजीपाला पिकांच्या जाती विकसित करण्याचा मानस बैठकीस व्यक्त करण्यात आला. या करारांतर्गत तंत्रज्ञान प्रसार, कापूस, तूर व भाजीपाला पिकातील वाणांची देवाण-घेवाण, एकमेकाच्या सहकार्याने संशोधन, बिजोत्पादन आणि पदव्योत्तर शिक्षण इ. बांबीचा समावेश करण्यात आला आहे.

याप्रसंगी मकृविचे संशोधन संचालक डॉ.जी.आर.मोरे, संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता डॉ.व्ही.एस.शिंदे, संचालक विस्तार शिक्षण डॉ.ए.एस.ढवण, प्राचार्य, विविध विभागाचे विभाग प्रमुख आणि वरिष्ठ शास्त्रज्ञ उपस्थित होते.

बैठकीच्या शेवटी आभार प्रदर्शन डॉ.ए.एस.कारले, उपसंचालक संशोधन यांनी केले.

संचालक संशोधन